



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ९४, बुधवार ५ मार्च २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# धनंजय मुंडे यांची विकेट पडली!

## ■ मंगळवारी सकाळी तडकाफडकी राजीनामा ■ देशमुखांची छायाचित्र पाहून राज्यभरात संतापाची लाट

मुंबई : विशेष प्रतिनिधी

**महायुती सरकारमधील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळातील अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंगळवारी सकाळी सुपूर्द केला. मुख्यमंत्री फडवणीस यांनी मुंडे यांनी आपल्याकडे राजीनामा दिला असून ते आपण स्विकारला असून तो पुढील कार्यवाहीसाठी राज्यपालांकडे पाठविला असल्याचे सांगितले.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घुण हत्या प्रकरणात मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड हा प्रमुख आरोपी असल्याचे सीआयडीच्या वतीने दोषारोपपत्र दाखल करण्यात आल्यानंतर स्पष्ट झाले. त्यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर राजीनाम्यासाठी वाढता दबाव होता. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड याच्यासह इतर सहा आरोपींना अटक करण्यात आली असून अद्याप एक आरोपी फरार आहे.



पारनेर दर्शन Special

### नैतिकतेवर राजीनामा : अजित पवार

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही प्रतिक्रिया दिली. अजित पवार यांनी केवळ दोन वाक्यात मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य केले. ते म्हणाले, धनंजय मुंडे यांनी नुकताच त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी नैतिकतेवर राजीनामा दिला आहे.

### राज्यभर संतापाची लाट

सीआयडीने न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रात संतोष देशमुख हत्याकांडाचे काही छायाचित्रे सादर करण्यात आली आहेत. देशमुख यांची हत्या करतानाची छायाचित्रे पाहून राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे, मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणीही तीव्र झाली होती.

### पदाचा आणि उपचाराचा काय संबंध ?

सरकारवर नामुष्की ओढावली, मी या स्वरूपाचा राजीनामा देतो तसं ते बोलत नाही. आताही मग्रुरीची तीच भाषा आहे. माझं दुखतंय मी राजीनामा देतोय, उपचारासाठी. पदाचा आणि उपचाराचा काय संबंध ? बरं झालं. मुख्यमंत्री आणि अजितदादांना कळालं माजोरडा आहे म्हणून. महाराष्ट्रातील मराठयांनाही कळायला हवं होतं. मराठयांनी सावध राहून त्यांना मोठं करू नये.मराठयांनी हातचं राखून काम केले पाहिजे.

मनोज जरांगे

### वैद्यकिय कारणास्तव राजीनामा

धनंजय मुंडे यांनी राजीनाम्यानंतर एक्स मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफार्मवर पोस्ट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. मुंडे म्हणतात, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घुण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी ही माझी पाहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झालं आहे. या प्रकरणाचा तपास पुर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झालं आहे. तसेच न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सद्सद्विवेक बुध्दीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला मला डॉक्टरांनी दिला आहे. त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुध्दा मी मंत्रीमंडळातून माझ्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री महोदयांकडे मी राजीनामा दिला आहे.

धनंजय मुंडे, मा. मंत्री

### देशमुखांवर नव्हे, प्रशासनावर लघुशंका !

संतोष देशमुख हत्याकांडाचे छायाचित्रे पाहून धनंजय मुंडे यांच्या पत्नी करूणा शर्मा यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींना देशमुख यांच्यावर नव्हे तर राज्यातील सरकारवर लघवी केली आहे. हसत हसत संतोष देशमुख यांच्या मृतदेहाचे फोटो, व्हिडीओ काढण्यात येत होते. त्यातून त्यांची मानसिक स्थिती दिसत आहे.वाल्मिक कराड हा व्हिडीओ लाईव्ह पहात आहे. आपला महाराष्ट्र कुठे गेला आहे असा सवाल करत त्यांना फाशीच झाली पाहिजे अशी मागणी शर्मा यांनी केली.

### मग्रुरी जशीच्या तशी

जे झालं ते चांगलं झालं. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार याची नियत महत्वाची आहे. एवढी मोठी घटना होऊन मग्रुरी जशीच्या तशी आहे. त्यांना पश्चाताप होणार नाही. असं करून हे सर्वांच्या नजरेतून उतरणार आहेत. एक दिवस यांची लंका बुडणार आहे. हे लयाला जाणार, पाताळात जाणार अशी टीका मनोज जरांगे यांनी केली.

### मुंडे ३०२ मध्ये आहे म्हणजे आहे

यांची आधी टोळी आत गेली. धनंजय मुंडे ३०२ मध्ये आहे म्हणजे आहे. मी फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे मागणी करतो की पुरवणी तपास करा. पुरवणी तपासात सर्वांना सहआरोपी करा. धनंजय मुंडेंनाही सहआरोपी करा. दोन ते तीन महिन्यात प्रकरण संपवा अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

### राजीनामा ही कबुलीच !

संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो बाहेर पडले, यामुळे केवळ या प्रकरणातील आरोपींचेच नाही तर या आरोपींना पोसणाऱ्या, पाठीशी घालणाऱ्या अनेकांचे चेहरे व चेहऱ्यामागची विकृती उघडी पडली आहे. या क्रुर गुन्हेगारांचा आश्रयदाता धनंजय मुंडेच असल्याचे जाहिरपणे सांगून निःपक्षपातीपणे या प्रकरणाचा तपास व्हावा. यासाठी धनंजय मुंडेला मंत्रीपद देऊच नये अशी मागणी आम्ही अडीच महिन्यांपूर्वी केली होती. मात्र लोकभावना बासनात गुंडाळून मुंडेला मंत्रीपद दिले गेले. राजीनाम्याच्या मागणीकडेही अडीच महिने दुर्लक्ष केले गेले. किंचितही नैतिकता असती तर अडीच महिन्यापूर्वीच हा राजीनामा दिला गेला असता. मंत्रीपदाचे कवच घालून आरोपपत्र दाखल होण्याची वाट पाहत होता का ? आजचा राजीनामा ही एक प्रकारची कबुलीच आहे.

संभाजीराजे छत्रपती

### त्यांची शपथच व्हायला नको होती

धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला आहे. मी त्याचे स्वागत करते. हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होते. राजीनाम्यापेक्षा त्यांची शपथच व्हायला नको होता.

पंकजा मुंडे
मंत्री

### उशिरा का होईना आभार

चार्जशीट दाखल होण्यापूर्वी राजीनामा द्यायला हवा होता. तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो हे असं आहे. राजकीय गुंड मित्र वाचविण्याचं काम केलं. उशिरा का असेना पण अजितदादा आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले पाहिजेत, असे जरांगे म्हणाले.

### गैरकृत्याला पक्षाचे समर्थन नाही

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी हे पत्रक राजी करत आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रारंभपासूनच अशी स्पष्ट भूमिका राहिली आहे की संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई झालीच पाहिजे. बीडसह संपूर्ण राज्यभरातील आपल्या पक्षाच्या नेत्यांनी याबाबत अत्यंत ठाम भूमिका घेतली आहे. आज धनंजय मुंडे यांनी घेतलेल्या राजीनाम्याचा निर्णय हा नैतिकतेला धरून आहे. संतोष देशमुख प्रकरणाचा तपास कोणत्याही दबावाशिवाय सुरु आहे. आणि तो असाच चालू राहून आरोनींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी ही आमची अपेक्षा आहे. हे प्रकरण न्यायालयीन असून तपास सुरु असल्याने त्यावर अधिक भाष्य करणे उचित ठरणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे सांगू इच्छितो की कोणत्याही गुन्हयाला गैरकृत्याला पक्षाचे किंवा आमच्या नेत्यांचे कधीही समर्थन असणार नाही. आजच्या घटनेतून हाच संदेश राज्याला गेला आहे. धनंजय मुंडे याचा या प्रकरणाशी संबंध आहे असे तपासात समोर आलेले नाही. मात्र नैतिकतेच्या मुद्यावर एक जबाबदार राजकीय नेता म्हणून धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पूर्वीच नैतिक मुद्यांवर स्वतः राजीनामा देण्याचे उदाहरण निर्माण केले होते. आणि या प्रकरणातही त्यांनी तशीच ठाम भूमिका घेतली होती. या प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेस एक महत्वाचा संदेश देत आहे. न्याय व्यवस्था आणि कायदा यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. आणि त्यांच्या कामात आम्ही कधीही हस्तक्षेप करणार नाही. न्यायाला विलंब होऊ नये यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

सुनील तटकरे, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार

### पाषाण हृदयी सरकार !

संतोष देशमुख हत्याकांडाचे आरोपपत्र दाखल करताना अनेक फोटो आणि व्हिडीओज सादर करण्यात आले. या फोटो आणि व्हिडीओची कल्पना सरकारला आधीच होती. किंबहूना हे सर्व फोटो, व्हिडीओ सरकारकडे आधीच होते. पण हे फोटो-व्हिडीओ पाहिल्यावर सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटला नाही ? निर्दयी सरकारच्या हृदयात कालवाकालव कशी झाली नाही ? हे सर्व पुरावे असतानाही राजीनामा घेतला नाही. पण सोमवारी हे फोटो लोकांपर्यंत गेल्यानंतर मंगळवारी राजीनामा घेण्यात आले. यावरून हे सरकार किती निर्दयी आहे हे स्पष्ट झाले आहे. लोकभावनेची कदर न करणारे हे पाषाण हृदयी सरकार आहे. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा गुन्हा सहन करतं. यावरूनच दिसतंय की महाराष्ट्राची अधोगती कोण करतोय ? राज्यातील गुन्हेगारांची हिंमत वाढू लागली आहे. पण, बुंद से गयी हो हौद से नही आती ! आता महाराष्ट्रात होणारा लोकउद्रेक पाहून त्यास वेगळे वळण देण्यासाठी विरोधी आमदाराचे स्टेटमेंट घेऊन वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न कराल.असे स्टेटमेंट देणाऱ्याची मानसिकता आता जनता पुरती ओळखू आहे. त्याचा बोलविता धनी कोण असेल हे जनतेच्या लक्षात आले आहे.

जितेंद्र आव्हाड, प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार

### दोन अडीच महिने तमाशा बघत होता काय ?

मुख्यमंत्री आले आणि दोन ओळीच बोलले की त्यांचा राजीनामा आला. तो मी स्वीकार केलाय. तो गव्हर्नरकडे पाठवलाय. का मुख्यमंत्री म्हणून तुम्ही दोन अडीच महिने सगळा तमाशा बघत होतात का ? तुम्ही त्याच्यावर का भुमिका घेतली नाही ?

अंजली दमानिया, सामाजिक कार्यकर्त्या

### नैतिकता आणि मुंडे यांची कधीच गाठ नाही

८४ दिवसांनंतर अचानक नैतिकता सुचली का ? धनंजय मुंडे आणि नैतिकता यांची कधी गाठ नाही. हत्या सुरू असताना आरोपी एकमेकांशी व्हिडीओ कॉलद्वारे संपर्कात होते. आणि वाल्मिक कराडने व्हिडीओ कॉल संपल्यानंतर धनंजय मुंडे यांना फोन केला होता. या प्रकरणाची सखोल आणि पारदर्शक चौकशी होण्याची आवष्यकता आहे. आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी.

खासदार सुप्रिया सुळे, लोकसभा सदस्य

### देशमुखांच्या हत्येचं पान मुंडेंशिवाय परस्पर कसं हाललं ?

देवाची काठी लागत नाही. परंतू न्याय मिळतो. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनीही ठाम भूमिका घेतली. आज तो न्याय दिसला. सावरगांव येथील सभेत मंत्री पंकजा मुंडे यांनी वाल्मिक कराड यांच्याशिवाय धनंजय मुंडे यांचे पान सुध्दा हालत नाही असे वक्तव्य केले होते. मग संतोष देशमुखांच्या हत्येचं पान धनंजय मुंडेंशिवाय परस्पर कसं हललं ?

आमदार सुरेश धस
विधानसभा सदस्य

### मुंडे यांना सहआरोपी करा

मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा हा सामान्य लोकांच्या मनातील संतापाच्या उद्रेकाचा आणि देशमुख कुटूंबाच्या संघर्षाचा परिणाम आहे. पण केवळ राजीनामा दिला म्हणून हा विषय इथंच संपत नाही, तर संतोष देशमुख खून प्रकरणी आणि आवादा कंपनीकडे मागितलेल्या खंडणीच्या गुन्हयात त्यांना सहआरोपी करून पारदर्शक तपास कररण्याची आणि सुधारित चार्जशीट दाखल करण्याची गरज आहे. तरच संतोष देशमुख यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. त्यासाठी आम्ही सरकारला भाग पाडू.

आमदार रोहित पवार, विधानसभा सदस्य

## देवगिरीवर सव्वा तासाची बैठक; अन् मुंडेंचा राजीनामा!

बीडचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडात कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे सहकारी वाल्मीक कराड याला आरोपी करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंगल्यावर मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय घेण्यात आला. संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या जवळपास तीन महिन्यांनंतर आज मुंडेंनी राजीनामा दिला आहे.दरम्यान संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर त्यांची खंडणी प्रकरणातून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. यामध्ये धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हा मुख्य सूत्रधार आहे. त्यामुळे नैतिकतेच्या आधारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरून मुंडे यांनी आपला मंत्रीपदाचा राजीनामा दिल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसने म्हटले आहे. विरोधकांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी हिवाळी अधिवेशनापासून केली होती. पण या मागणीस राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मुहूर्त सापडला.संतोष देशमुख हत्येनंतर महाराष्ट्रभरात मोर्चे निघाले. याकाळातच राज्याचा मंत्रिमंडळ विस्तार झाला त्यात धनंजय मुंडेंनी मंत्रिपदाची शपथ घेतली. तर यावेळी वाल्मीक कराड नागपुरात फार्म हाऊसवर लपल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यानंतर वाल्मीक कराडवर कारवाई करावी आणि धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा ह्या मागण्या करण्यात आल्या. यानतंर काही दिवसांनी आरोपी पकडले गेले. मग पुण्यात वाल्मीक कराड सीआयडीला शरण आला. धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळात वर्णी लागल्याने या हत्याकांडातील आरोपींना शासनाचे संरक्षण मिळाल्याची भावना विरोधकांसह भाजपच्या आमदारांनी केली. त्यामुळे या हत्याकांडाची सर्वत्र मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली.देशमुख हत्याकांड प्रकरणात वाल्मीक कराड हा प्रकरणाचा सूत्रधार असल्याचे तपास यंत्रणनेने आरोपपत्रात नमूद केले. तत्पूर्वी वाल्मीक कराड माझा खास असल्याचे स्वतः धनंजय मुंडेंनी कबूल केले होते. त्यामुळे त्यांच्या मंत्रिपदाभोवती आपोआप फास घट्ट व्हायला सुरुवात झाली. त्यातच संतोष देशमुख यांना हालहाल करून मारल्याचे व्हिडिओ आणि फोटो अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना समोर आले.बीडमध्ये वाल्मीक कराड हा प्रति धनंजय मुंडे म्हणूनच वावरत होता. मुंडेंच्या गैरहजेरीत बीडचे पालकमंत्रीपद असो की परळीचे राजकारण सर्व गोष्टी वाल्मीक कराड म्हणजेच आण्णा पाहत होता. यात अंजली दमानिया यांनी तर या दोघांची एकत्रित संपत्तीच बाहेर काढली. तर पंकजा मुंडेंनीही एका भाषणात ज्यांच्या शिवाय धनंजय मुंडेंचे पान हालत नाही असे आण्णा म्हणत वाल्मीक कराडचा उल्लेख केला होता. खंडणी अन् दहशत बसावी म्हणून या टोळीने संतोष देशमुख यांचा खून करत त्यांचे व्हिडिओ अ फोटो काढले.काल मुख्यमंत्री एका लाल गाडीत बसून उपमुख्यमंत्र्याकडे गेले. तिथे बैठक झाली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास सव्वा तास चर्चा झाली. त्या ठिकाणी आधीच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वाढलेल्या दबावाचे कारण देतानाच, व्हायरल फोटोमुळे वातावरण तापण्याची शक्यता लक्षात घेत धनंजय मुंडेंना राजीनामा देण्याच्यासूचना दिल्या. धनंजय मुंडे यांनी नैतिकतेवर राजीनामा दिला आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा दिला असून मी तो स्वीकारला आहे. पुढील कारवाहीसाठी तो राज्यापालांकडे पाठविला आहे. त्यांना कार्यमुक्त केले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी संतोष देशमुख हत्याकांडातील एकही आरोपीला सोडले जाणार नाही मग तो कितीही मोठा असला तरी...! असा इशारा दिला. परंतु राजीनाम्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंडे यांच्या विरुद्ध कुठलाही पुरावा नाही. त्यांचा या घटनेशी संबंध नाही असे सांगून राजीनामा घेणार नाही असे सातत्याने सांगितले. तसेच धनंजय मुंडे यांनीदेखील मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले तर लगेच राजीनामा देईन असे वारंवार सांगितले.

# युवा

व्हॅलेंटाइन्स विक स्पेशल

## लहान वयाची पत्नी का ठरते बेस्ट जोडीदार ?

**लग्न जुळवताना मुलगा आणि मुलगी या दोघांच्या घरची एकच अट असते की दोघांच्या वयात जास्त अंतर नसावे. सामान्यतः मुलाचे वय जास्त असेल आणि मुलीचे कमी तर मुलीच्या घरचे नकारच देतात. अर्थात त्या मागे त्यांची स्वतःची सुद्धा काही कारणे असतात. वयात जास्त अंतर असेल तर तो व्यक्ती आपल्या मुलीला लवकर सोडून स्वर्गवासी होईल ही सर्वात मोठी भीती मुलीच्या घरच्यांना असते. शिवाय वय जास्त असल्याने समाजातील मान राखण्याचा प्रश्न सुद्धा निर्माण होतो. नातेवाईक नावं ठेवण्याची शक्यता असते. पण या सर्व गोष्टी आपण बाजूला ठेवल्या आणि कमी वयाची मुलगी आणि जास्त वयाचा मुलगा यांच्या केवळ नात्याचा विचार केला तर ते नातं कितपत यशस्वी होत असेल ? तर मंडळी या प्रश्नाचे उत्तर आहे होय! अशी नाती यशस्वी होतात आणि सुखाचा संसार करतात. जास्त विचार करण्याची गरज नाही, तुम्हाला कित्येक प्रसिद्ध बॉलिवूड कपल्सची उदाहरणे सहज दिसतील. आज त्याच कपल्स बद्दल आपण जाणून घेऊया.**

### रितेश आणि जेनेलिया

बॉलिवूडमधील सर्वात हॅप्पी कपल म्हणून या दोघांकडे पाहिलं जातं. ना कधी त्यांच्या भांडणाची बातमी येते, ना कोणत्या वादाची, गेली कित्येक वर्षे दोघांचा संसार सुरळीत सुरू आहे दोघांमध्ये ७ वर्षांचे अंतर असून सुद्धा! हो रितेश हा जेनेलियापेक्षा सात वर्षांनी मोठा आहे. पण वयाच्या या अंतरामुळे कुठेच त्यांच्या नात्यात अंतर आले नाही. अर्थात याचं श्रेय दोघांनाच जातं. कारण त्यांनी ते नातं सांभाळलं आहे. त्यांच्या नात्याची खास गोष्ट म्हणजे ते कधीच आपल्या नात्यातील रोमान्स कमी होऊ देत नाहीत. नेहमी एकमेकांशी प्रेमाने वागतात आणि आपलं नातं सुंदर राखण्याचा प्रयत्न करतात.



### शाहीद आणि मीरा

शाहीद आणि मीरा यांचं लग्न किती अचानक झालं हे सर्वांनाच ठावूक आहे. अनेकांना वाटत होतं की शाहीद कोणत्या तरी बॉलिवूड अभिनेत्री सोबतच लग्न करेल, पण सर्वांच्या अंदाजाला दूर सारत त्याने निवड केली मीरा राजपूतची. जी त्याच्यापेक्षा १ किंवा २ नाही तर तब्बल १४ वर्षांनी लहान आहे. पण कुठेच या गोष्टीचा त्यांच्या नात्यावर प्रभाव दिसून येत नाही. त्यांच्या नात्याचं एक गुपित म्हणजे दोघांनी एकमेकांना बॉलिवूडच्या दिखाव्यापासून दूर ठेवलं आहे. मीरा तर फार कधी कॅमेऱ्यासमोर येत नाही आणि शाहीदसुद्धा. केवळ चित्रपट प्रमोशन वगळता अन्य वेळी कॅमेरापासून दूरच राहतो. दोघेही शक्य तेवढा वेळ आपल्या संसाराला देतात आणि खुश राहतात.



### सैफ आणि करीना

नेहमी चर्चेत राहणारी अत्यंत प्रसिद्ध आणि वयात मोठं अंतर असणारी जोडी करीना आणि सैफ अली खान पेक्षा १० वर्षे लहान आहे. मात्र तरी तिने स्वतःच्या मर्जीने सैफचा पती म्हणून स्वीकार केला. कारण तिचं खरंच त्याच्यावर प्रेम होतं. दोघांचं एकमेकांवर असलेलं हे गोड प्रेम नेहमी लहानसहन गोष्टीतून देखील दिसत असतं. या दोघांनी दाखवून दिलंय की जर प्रेम खरं असेल तर ते यशस्वी होतंच. तुम्ही कोणत्याही व्यक्तीसोबत खुश राहू शकता. त्यांचे विचारसुद्धा अत्यंत आधुनिक असून ते पती- पत्नी कमी व मित्र मैत्रीण या नात्याने एकमेकांसोबत जास्त वागतात.

### अजय आणि काजोल

ही गोष्ट फार लोकांना माहीत नाही पण हे खरे आहे की अजय देवगण आणि काजोल या दोघांच्या वयातही मोठे अंतर आहे. दोघांत सहा वर्षांचं अंतर आहे. मात्र दोघांकडे पाहून अजिबात या गोष्टीवर विश्वास बसत नाही. कारण त्यांचे एकमेकांवर प्रेमच तितके अफाट आहे. दोघांच्या संसाराला आता २० वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला




आहे. मात्र आजही त्यांचे नाते सदाबहार आहे. त्यांच्या लग्नावेळी अनेकांनी त्यांचे हे नाते कितपत टिकेल यावर शंका व्यक्त केली होती. मात्र दोघांनी आपला संसार यशस्वी करून दाखवला आणि सिद्ध केले की प्रेमात सारं काही शक्य आहे फक्त इच्छाशक्ती हवी. त्यांचे हे प्रेमळ नाते वयात अंतर असून सुद्धा आयुष्यभर साथ देऊ इच्छिणाऱ्यांसाठी आदर्श आहे.

## ओझे नाही, दबाव नाही, जबाबदारी नाही...

# तरुणाई का ठेवतेय लग्नापासून अंतर ?

काळाबरोबर तरुण पिढीचा दृष्टिकोन बदलला आहे. लग्न आता त्यांच्यासाठी गरजेपेक्षा पर्याय बनले आहे. त्यांना त्यांचे करिअर, स्वातंत्र्य आणि मानसिक शांती यांना प्राधान्य द्यायचे आहे. जरी ही मानसिकता समाजाच्या पारंपरिक रचनेला आव्हान देत असली तरी, हा बदल तरुण पिढीच्या वाढत्या स्वावलंबनाचे आणि नवीन कल्पनांचे प्रतिबिंब आहे.

राहुल आणि आयुषी दोघेही यशस्वी प्रोफेशनल आहेत. कॉलेजमध्ये भेटले, करिअर सुरू केले आणि स्वतःच्या पद्धतीने आयुष्य जगू लागले. कुटुंब आणि समाजाकडून लग्नासाठी दबाव वाढू लागला, पण दोघेही तयार नव्हते. एके दिवशी राहुलच्या आईने विचारले, तुम्ही दोघे लग्न कधी करणार ? तो हसला आणि म्हणाला, आई, लग्न हे काही ध्येय नाहीये. आम्हाला जबाबदाऱ्यांमध्ये अडकायचे नाही. त्याचप्रमाणे, आयुषीची मैत्रीण प्रियाने लग्नाचा विचार पूर्णपणे सोडून दिला. कारण तिला तिच्या करिअरला आणि प्रवासाच्या आवडीला प्राधान्य द्यायचे होते. ही कहाणी फक्त राहुल, आयुषी किंवा प्रियाची नाही तर हजारो तरुणांची आहे जे आता लग्नाला जीवनाचा एक आवश्यक भाग मानत नाहीत. समाजात लग्न ही अजूनही एक महत्त्वाची परंपरा मानली जाते, परंतु नवीन पिढी त्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत आहे. आजच्या काळात वैयक्तिक स्वातंत्र्य, स्वावलंबन आणि मानसिक संतुलनाला अधिक महत्त्व दिले जात आहे. पूर्वी लग्न हे आयुष्यातील सर्वात मोठे यश मानले जात होते, पण आता तरुणांना ते त्यांच्या स्वप्नांमध्ये आणि स्वातंत्र्यात अडथळा म्हणून दिसू लागले आहे. ही मानसिकता हळूहळू समाजात मूळ धरत आहे आणि लग्नापासून अंतर ठेवणे हा एक नवीन ट्रेंड बनला आहे.



### करिअर आणि वैयक्तिक स्वातंत्र्याला सर्वोच्च प्राथमिकता

सौरभ (वय २९, मुंबई): एक यशस्वी सॉफ्टवेअर इंजिनिअर, ज्याने लग्न करण्याऐवजी आपल्या स्टार्टअपवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. त्याला वाटते, की लग्न ही एक जबाबदारी आहे आणि जोपर्यंत तो त्याच्या कारकिर्दीत पूर्णपणे समाधानी होत नाही तोपर्यंत ते करण्यात काही अर्थ नाही. खरं तर, बदलत्या काळानुसार, तरुणाई करिअरला प्राधान्य देत आहे. त्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत होऊन प्रथम स्वतःला स्थापित करायचे आहे जेणेकरून त्यांना कोणावरही अवलंबून राहावे लागू नये. लग्नाला प्राधान्य देण्याऐवजी, ते त्यांच्या आवडीनुसार आणि जीवनशैलीनुसार निर्णय घेण्यास प्राधान्य देतात.

### नात्यांमधील वाढती गुंतागुंत अन् मानसिक शांती

करण (वय २८, चंदीगड) त्याच्या आईवडिलांचा एकुलता एक मुलगा असूनही, त्याने लग्नाचा विचार सोडून दिला आहे. तो कोणत्याही अतिरिक्त जबाबदाऱ्यांशिवाय त्याचे छंद, तंदुरुस्ती आणि मानसिक शांती यांना प्राधान्य देऊ इच्छितो. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. गौरव गुप्ता म्हणतात की, खरं तर आजकाल नातेसंबंध पूर्वीसारखे सोपे राहिलेले नाहीत. अपेक्षा, ताणतणाव यामुळे कधीकधी वैवाहिक जीवन मानसिक शांततेत अडथळा ठरते. म्हणूनच, अनेक तरुण अशा गुंतागुंतीच्या नात्यांपासून दूर राहण्यासाठी अविवाहित राहणे किंवा लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या आधुनिक संकल्पना स्वीकारणे पसंत करत आहेत.



### स्वत :च्या मनाप्रमाणे जगण्याची इच्छा

फॅशन इंडस्ट्रीमध्ये काम करणारी नेहा (वय २७, दिल्ली) लग्नाचा विचार पूर्णपणे नाकारते. तिला जग फिरायचे आहे, नवीन ठिकाणे एक्सप्लोर करायची आहेत आणि स्वतःच्या अटींवर जगायचे आहे. तिला वाटते की लग्नामुळे तिच्या स्वप्नांवर पाणी पडू शकते. पारंपरिक समाजात लग्न अनिवार्य मानले जात असे, परंतु आता तरुणाई या कल्पनेला आव्हान देत आहे. कुटुंब आणि समाजाच्या दबावाखाली लग्न करण्याऐवजी ते त्यांच्या इच्छेनुसार जीवन जगण्याला प्राधान्य देत आहेत.

### लिव्ह-इन रिलेशनशिपचा ट्रेंड

अभिषेक (वय ३१, बेंगळुरू), जो एक कॉर्पोरेट प्रोफेशनल आहे. त्याने त्याच्या पालकांच्या सततच्या दबावाला न जुमानता लग्न केले नाही. तो म्हणतो, माझ्यासाठी लग्न ही काही कामगिरी नाही, पण स्वतःला सुधारणे आणि स्वावलंबी असणे हे अधिक महत्त्वाचे आहे. आता लग्न हे आयुष्यभराचे बंधन आहे ही कल्पना कमकुवत होत चालली आहे. अनेक तरुण कोणत्याही कायदेशीर आणि सामाजिक दबावाशिवाय एकत्र राहणे पसंत करतात. लिव्ह-इन रिलेशनशिप आणि ओपन रिलेशनशिपचा वाढता ट्रेंड हे याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. ही उदाहरणे दर्शवितात की आजचे तरुण स्वतःच्या अटींवर जगू इच्छितात आणि लग्नाला जीवनाचा एक आवश्यक भाग म्हणून नव्हे तर फक्त एक पर्याय म्हणून पाहतात.

### लग्नातील वाढता खर्च अन् जबाबदाऱ्या

रिया (वय ३०, पुणे), एक स्वतंत्र लेखिका, तिने पारंपरिक नात्यांपासून स्वतःला दूर केले आहे. तिला नातेसंबंधांमधील गुंतागुंत आणि समाजातील अनावश्यक दबाव टाळायचे आहेत. याचे एकच कारण आहे; आजच्या काळात लग्न हे फक्त दोन व्यक्तींचेच नव्हे तर संपूर्ण कुटुंबांचे मिलन बनले आहे. महागडे लग्न, हुंडा सारख्या वाईट गोष्टी आणि आर्थिक जबाबदाऱ्या यामुळे अनेक तरुण लग्नापासून दूर गेले आहेत. त्यांना हे सर्व टाळायचे आहे आणि कोणत्याही दबावाशिवाय मुक्तपणे जगणे पसंत करायचे आहे.

# त्यांच्या भावनांचा करा आदर!

आयेशाला जेव्हा श्रेयसने प्रपोज केलं तेव्हा क्षणाचाही विलंब न करता तिने त्याला होकार दिला. अर्थातच श्रेयसला नाकारण्यासारखं काहीच नव्हतं. शाळेतल्या कित्येक मुलींचा तो क्रश होता. स्पोर्टस् असो वा कल्चरल ॲक्टिव्हिटी सर्वांत तो पुढे असायचा. शाळेतला हिरोच होता श्रेयस. पण आयेशाही कमी नव्हती. पहिला नंबर तिने कधीच सोडला नव्हता. त्यातच तिच्या सौंदर्याचं कौतुक प्रत्येक जण करे. दोघेही एकमेकांसाठी साजेसे होते. प्रेमात पडल्यावर जग फार सुंदर दिसतं, असं म्हणतात. ते दोघं तर त्याचा अनुभव घेत होते. सतत एकमेकांच्या विचारात राहणं, एकमेकांना भेटण्यासाठी किंवा फोनवर बोलण्यासाठी आतुर असणं, घरी मित्र-मैत्रिणींची नावं सांगून चोरून भेटणं यात वेगळीच मजा होती. एवढी सुंदर मुलगी आपली गर्लफ्रेंड आहे या विचाराने श्रेयसचा आत्मविश्वास आणि मित्रांमधलं स्थान वाढलं होतं. आयेशा अभ्यासापेक्षा आपलं सौंदर्य अधिक कसं खुलवता येईल या विचारात मग्न असायची. या आनंदाला तडा गेला जेव्हा आयेशाच्या क्लासमधून घरी फोन आला आणि तिची अनुपस्थिती परीक्षेतल्या कमी गुणांबाबत आई-वडिलांना कळलं. आयेशावर पाळत ठेवल्यावर तिचं आणि श्रेयसचं प्रेमप्रकरण समोर आलं. अवघ्या १७ वर्षांची आयेशा हेच खरं प्रेम आहे, तुम्हाला कळणार नाही, असं म्हणून भांडू लागली तेव्हा आई-वडीलही चकित झाले. कोणत्याही घरात घडेल असा हा प्रसंग. आपली मुलं वयात आली आहेत, याची पालकांना जाणीव करून देत खडबडून जागं करणारा. पालकांना बसलेला धक्का इतका जबर असतो की त्यांना ही घटना कशी हाताळावी हेच कळत नाही.

### मॅच्युरिटी फार लवकर

शाळकरी वयात प्रेमप्रकरण निर्माण होण्यास कोण कारणीभूत आहे, टी.व्ही., इंटरनेट की मित्रपरिवार ? या प्रश्नाचं उत्तर आहे मुलांची बदलती मानसिकता. आजच्या पिढीत मुलांमध्ये समज (मॅच्युरिटी) फार लवकर येत आहे. याचं कारण आहे त्यांना मिळणारं एक्सपोजर, सिनेमात दाखवली जाणारी दृश्यं, मित्र-परिवारांसोबत बदललेले गप्पांचे विषय, इंटरनेटवरून सहजरीत्या मिळणारी माहिती. केवळ सिनेमात नाही तर एखादी कौटुंबिक मालिका जेव्हा आपण मुलांसोबत बघतो तेव्हा ते देखील त्यात सहजच एकरूप होतात. काळ बदलला आहे आणि सोशल मीडिया आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे.

### अनुकरण अन् चुकीच्या समजुती...

टीनएजर्समध्ये १५ वर्षांपर्यंत जर कोणाचे प्रेमप्रकरण झाले नाही तर त्या मुलात किंवा मुलीत दोष आहे असं समजलं जातं आणि तो चिडवण्याचा विषय बनतो, ही वस्तुस्थिती आहे. या दबावाखालीही प्रेमसंबंध निर्माण होतात. मित्रांचं अनुकरण हेही कारण असू शकतं. या वयातील प्रेमसंबंध हा मुलांच्या विकासामधीलच एक भाग आहे. अल्लड असलं तरीही स्वतःचं अस्तित्व घडवण्याचं हे वय असतं. त्यामुळे हे नातं म्हणजे मी कोणीतरी आहे, मी कोणालातरी आवडू शकतो ही भावना आत्मविश्वास वाढवते, स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता येते आणि प्रेमभंगातून आपल्या भावना कशा जपायच्या, नातं कसं टिकवायचं, जपायचं हेही कळतं. या नात्यातून आयुष्यात तडजोड कशी करायची हे मुलं शिकतात.



### संयम हरवतोय...

आजकाल प्रेमभंगातून आत्महत्या केल्याच्या घटना मोठ्या प्रमाणात होत आहेत. याला कारण आहे मुलांमध्ये संयम नाही. नकार स्वीकारण्यासाठी ते तयार नाहीत. ही प्रेमप्रकरणं स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी उद्‌भवतात. नकार म्हणजे पूर्णपणेच अपयश आहे असं वाटून मुलं डिप्रेशनमध्ये जातात. पालकांनी या परिस्थितीत त्यांना स्वतःच्या भावना कशा सांभाळाव्या याबाबत मार्गदर्शन करावं, जेणेकरून या वयातील आत्महत्येचं प्रमाण आपण कमी करू शकतो. पालकांसोबतच शाळा आणि शिक्षकांनीदेखील आजच्या पिढीला समजून घेण्याची गरज आहे. शाळेत अशी प्रकरणं आढळल्यास शिक्षकांनी पालकांना कळवावं, त्या मुलासोबत चांगल्या भाषेत बोलावं आणि योग्य मार्गदर्शन देण्यासाठी स्कूल कौन्सिलरकडे पाठवावं. त्याचसोबत पालकांमध्ये आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शन शिबीर भरवणं हेदेखील मुलांच्या भवितव्यासाठी फायद्याचं ठरेल.

### त्यासाठी काय कराल...

- या वयातील प्रेम हे दीर्घकाळ टिकणारं नसून ते एक आकर्षण आहे, जे कालांतराने आपणहून तुटेल म्हणून हे काहीतरी भयंकर आहे, असा प्रतिसाद देऊ नका.
- हे प्रेम आपल्यासाठी खरं नसलं तरीही मुलांसाठी ते खरं आहे म्हणून या प्रेमाला मुलांचा वेडेपणा न समजता त्यांच्या भावनांचा आदर करा.
- मुलाच्या गर्लफ्रेंड अथवा बॉयफ्रेंडला स्वतः भेटा. त्याच्या पालकांशीही संपर्क करा आणि एकत्रित चर्चा करून योग्य तो मार्ग निवडा.
- त्यांचं फोनवर बोलण्याची किंवा एकमेकांसोबत घालवण्याची वेळ यावर आळा घाला. ठराविक वेळ अभ्यास केल्यावर थोडा वेळ फोनवर बोलण्याची मुभा द्या.
- मुलांवर कितीही बंधनं घातली किंवा समजावलं तरीही त्यांची उत्सुकता कमी होणार नाही म्हणून शक्यतो घरात त्यांना एकटं ठेवू नका. त्यांच्या हातून काही अयोग्य घडेल अशी संधीच त्यांना देऊ नका.
- कुठल्याही गोष्टीवर ते तुमच्याशी संवाद साधू शकतील असं नातं आणि घरातलं वातावरण निर्माण करा.
- केवळ अभ्यास आणि करिअर याबाबतच मुलांशी चर्चा न करता इतरही विषयांवर बोला. कधीतरी सहजच त्यांच्यासोबत एक फेरफटका मारून या.
- या सर्वांसोबतच महत्त्वाचं म्हणजे त्यांना प्रेमभंग झाल्यास सावरा.

### कारण काय समजून घ्या

प्रथम अशा नात्यात आजची पिढी का ओढली जाते हे जाणून घेऊया. शरीरात होणारे बदल भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण निर्माण करतात हे आपल्या वाचनात वारंवार आलेलं असतं. अनादी काळापासून हे बदल शरीरात घडत होते, मग आत्ताच शालेय अवस्थेपासून प्रेमाच्या आणाभाका का?... कारण आता मुलांना मिळणारी मोकळीक. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांना आजी-आजोबांचं बंधन राहिलेलं नाही. आई-वडील दोघेही नोकरीनिमित्त बाहेर असल्यामुळे मुलं एकटीच घरी असतात. त्यामुळे फोनवर बोलणं, टीव्ही बघणं, इंटरनेटवर राहणं यावर ताबा घालता येत नाही. पाश्चिमात्य जीवनशैली आणि आपली संस्कृती यांचा मेळ घालताना मुलं गोंधळतात. मी मॉडर्न आहे, असं पटवून द्यायला ते या नात्यात ओढले जातात. भावना व्यक्त करण्यासाठी त्यांना समवयस्क व्यक्तीची गरज असते आणि आपल्याला कोणीतरी समजून घेते आहे, महत्त्व देते आहे, स्वीकारते आहे आणि कौतुक करत आहे या गोष्टी मनाला आनंद देतात.

## शॉर्ट न्यूज

### तीन गावांसाठी १.२० कोटींचा निधी

**पारनेर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू सहकारी शिवसेनेचे राज्याचे प्रवक्ते संजीव भोर पाटील यांच्या प्रयत्नातून पारनेर तालुक्यातील मांडवे खु., खडकवाडी आणि रांजणगाव मशीद या तीन गावांतील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी प्रत्येकी ४० लाख रुपये, असा एक कोटी वीस लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, अशी माहिती शिवसेना प्रवक्ते संजीव भोर यांनी दिली. तीनही कामांच्या निविदा प्रक्रियेनंतर कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर कामांचे संजीव भोर यांच्या हस्ते कामाला प्रारंभ करण्यात आला.

### धनेगावात १९ लाखांचा गुटखा जप्त

**जामखेड :** तालुक्यातील खर्डा पोलीस स्टेशन हद्दीतील धनेगावात १९ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आले आहे. धनेगावच्या शिवारात स्थानिक गुन्हे शाखेने विक्री प्रतिबंधित सुगंधीत पान मसाला व तंबाखू विक्री करण्याच्या उद्देशाने आणलेला माल जप्त केला. यामध्ये हिरा पान मसाला व रॉयल ७१७ सुगंधित तंबाखू यांचा समावेश होता. जप्त केलेल्या मालाची किंमत १९ लाख ५३ हजार ६२० रुपये आहे. पो. कॉ. रोहित मिसाळ यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास खर्डा पोलीस करत आहेत.

### शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

**अकोले :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी वारंघुशी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. कर्जबाजारी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त करण्यात यावे, पीक विमा योजना शेतकऱ्यांना सरसकट पीकविम्याचा लाभमिळावा, धान (भात) हमीभाव मिळावा, बाळहिरड्याचा हमीभाव कृषी योजना अंमलबजावणी शेतकऱ्यांना सरकारी कृषी योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, यासाठी अधिकाऱ्यांनी शेतात जाऊन योजनांची अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी कोल्हार घोटी रस्त्यावर वारंघुशी फाटा येथे दोन तास रास्ता रोको करण्यात आले होते.

### कर्जतला प्लास्टिक मुक्त मोहीम

**कर्जत :** येथील न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांची प्लास्टिक मुक्त मोहीम वर्ग, शाळा, कुटुंब यात मर्यादित ठेवली नाही. याच विद्यार्थ्यांनी ती चळवळ आता गावात चालविण्याची तयारी हाती घेतली आहे. शाळेने प्लास्टिक मुक्तीची भित्तिपत्रके गावातील महत्त्वाच्या दुकानात आणि गर्दीच्या ठिकाणी लावत जनजागृती केली. आसपासचा प्लास्टिक कचरा एका पाण्याच्या मोकळ्या बाटलीत भरत विद्यार्थी ही भरलेली बाटली शाळेत जमा करतात. प्लास्टिकच्या बाटल्या झाडांना कुंडीसारखे आकार देत त्यांचा पुनर्वापर सुरू केला आहे.

### शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

**अकोले :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी वारंघुशी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. कर्जबाजारी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त करण्यात यावे, पीक विमा योजना शेतकऱ्यांना सरसकट पीकविम्याचा लाभमिळावा, धान (भात) हमीभाव मिळावा, बाळहिरड्याचा हमीभाव कृषी योजना अंमलबजावणी शेतकऱ्यांना सरकारी कृषी योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, यासाठी अधिकाऱ्यांनी शेतात जाऊन योजनांची अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी कोल्हार घोटी रस्त्यावर वारंघुशी फाटा येथे दोन तास रास्ता रोको करण्यात आले होते.

# द्वारयात्रा पालखी मार्गासाठी १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर

## ■ पीएमआरडीएच्या आमसभेत निधीला मंजुरी ■ रांजणगाव देवस्थान ट्रस्टच्या अनेक वर्षांच्या मागणीला यश

**शिरूर : प्रतिनिधी**

**पुणे क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या ११ व १२ व्या आमसभेत रांजणगावच्या श्री महागणपती द्वारयात्रा रांजणगाव गणपती देवस्थान ते निमगाव म्हाळुंगी व ढोकसांगवी पालखी मार्गासाठी १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.**

पीएमआरडीए ची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ११ व १२ वी आमसभा नुकतीच संपन्न झाली. या आमसभेतून शिरूर - हवेली विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे.




त्यापैकी श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ते निमगाव म्हाळुंगी द्वारयात्रा रस्ता सुधारणा करण्यासाठी ८ कोटी रुपये तसेच श्री क्षेत्र रांजणगाव गणपती ते ढोकसांगवी द्वारयात्रा ग्रामीण मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या दोन्ही द्वारयात्रा मार्गासाठी एकूण १२ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे.

भाद्रपद गणेशोत्सव काळात चार दिशांना असलेल्या महागणपतीच्या बहिणींना आणण्यासाठी रांजणगांवमधून श्रींची पालखी जाते. यामध्ये तालुक्यातील करडे, निमगाव म्हाळुंगी, गणेगाव व ढोकसांगवी या चार गावात रांजणगावसह परीसरातील नागरिक अनवाणी चार दिवस द्वारयात्रा काढतात. मात्र यापैकी निमगाव म्हाळुंगी आणि ढोकसांगवी या द्वारयात्रा मार्गाची अवस्था अतिशय दयनीय झाली होती. द्वारकऱ्यांना या मार्गावरुन चालताना मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती व्हावी, अशी रांजणगाव देवस्थान ट्रस्टची अनेक दिवसांची मागणी होती तिला अखेर यश आले आहे. शिरूर - हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या माध्यमातून हा निधी मंजूर झाल्याबद्दल रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले आहे.

### शिरूरसाठी ८५८.७६ कोटी तर हवेलीसाठी ५६९. ५९ कोटी रुपये निधी !

शिरूर- हवेली मतदारसंघात राज्य मार्ग, जिल्हा मार्ग तसेच मुख्य रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी व प्रशस्त रस्ते करण्यासाठी पीएमआरडीए कडे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून रस्त्यांचे प्रस्ताव देण्यात आले होते. या प्रस्तावावर अजित पवार यांनी शिरुर साठी ८५८.७६ कोटी तर हवेलीसाठी ५६९. ५९ कोटी रुपये इतका निधी दिला आहे. यापैकी रांजणगाव देवस्थान ट्रस्टच्या मागणीचा विचार करुन १२ कोटी रुपये रांजणगाव ते निमगाव म्हाळुंगी आणि ढोकसांगवी द्वारयात्रा रस्ता सुधारणा व मजबुतीकरणासाठी मंजूर करण्यात आले आहेत.

**ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके**
आमदार शिरूर - हवेली

# पंढरीत आषाढीपूर्वी टोकन दर्शन व्यवस्थेची चाचणी

## मंदिर समितीची जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक

**पंढरपूर : प्रतिनिधी**

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी टोकन दर्शनप्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित असून त्याची आषाढी यात्रेपूर्वी चाचणी घेण्याबाबत तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामाबाबत पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे सोमवारी मंदिर समितीची सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.**



या बैठकीत मंदिर जतन व संवर्धन कामाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये सध्या गाभारा, बाजीराव पडसाळी, सभामंडप व इतर आनुषंगिक ठिकाणी सुरू असलेली सर्व कामे आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण करून घेण्यात येणार असून दगडी कामास कोटिंग करणे व वॉटरप्रूफिंगची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत सूचना करण्यात आल्या. याशिवाय श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी टोकन दर्शनप्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित असून त्यांचा आषाढी यात्रेपूर्वी चाचणी घेण्यासाठी व मंदिर समितीचे कार्यालयीन कामकाज गतिमान करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या संगणक प्रणाली सेवाभावी तत्त्वावर मोफत उपलब्ध करून देण्याची मंदिर समितीची विनंती टीसीएस कंपनीने मान्य केल्याचे या वेळी सांगण्यात आले.

**चैत्र एकादशी ४ एप्रिल रोजी, २ ते १२ दरम्यान यात्रा**

ऑनलाइन डोनेशन, भक्तनिवास बुकिंग, पूजा बुकिंग, लाइव्ह दर्शन व इतर आनुषंगिक बाबींसाठी संगणक प्रणालीचा समावेश आहे. इत्यादीबाबत निर्णय घेण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी या वेळी सांगितले. प्रतिवर्षी चैत्र शुध्द कामदा एकादशी दिवशी चैत्री यात्रा भरते. या वर्षी चैत्री एकादशी ४ एप्रिलला होत असून यात्रेचा कालावधी २ ते १२ एप्रिल असा आहे. या यात्रा नियोजनाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये या यात्रेला येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी या वेळी सांगितले.

# जयहिंद संकुलात रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर

## १०९ रक्तदात्यांनी केले रक्तदान | स्व.तात्यासाहेब गुंजाळ जयंतीचे औचित्य

**नारायणगांव : प्रतिनिधी**

**जयहिंद शैक्षणिक संकुलाचे संस्थापक स्व. तात्यासाहेब गुंजाळ यांच्या जयंतीनिमित्त जयहिंद शैक्षणिक संकुल, रंगीलदास सुरतवाला ट्रस्ट व आनंदऋषीजी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीरात १०९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.**



डिसेंट फाऊंडेशन पुणे, श्री हॉस्पीटल आळेफाटा व हिंद लॅब जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये १२५ विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. या तपासण्यांमध्ये हिमोग्लोबीन, रक्तातील साखरेचे प्रमाण, रक्तदाब तसेच ईसीजी या तपासण्या मोफत करण्यात आल्या. या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन डिसेंट फाऊंडेशनचे सचिव एफ. बी. आतार यांच्या हस्ते झाले तर रक्तदान शिबिराचे उद्घाटन श्री हॉस्पीटलचे प्रशासकीय अधिकारी संतोष शिंदे व आनंदऋषीजी ब्लड बँकेचे सुनिल खताळ यांच्या हस्ते झाले.

यावेळी संस्थेच्या संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे, प्राचार्य डॉ. डी. जे. गरकल, प्राचार्य डॉ. स्वप्निल पोखरकर, प्राचार्य सुभाष आंद्रे, सर्व विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराचे नियोजन जयहिंद पॉलिटेक्निक राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. पटाईत एस. बी. यांनी केले.

# चौकशीनंतर नाण्याची दुसरी बाजूही दाखवावी

## आरोपी दत्ता गाडेच्या भावाची मागणी

**पुणे : प्रतिनिधी**

**'चौकशीनंतर नाण्याची दुसरी बाजूही दाखवावी,अशी मागणी स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेच्या भावाने केली आहे. पुण्यातील स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेचा भाऊ आणि आरोपीचे वकील वाजिद खान व साजीद शाह यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ही मागणी करण्यात आली आहे.**




यावेळी आरोपीच्या भावाने सांगितले की, आरोपी दत्ता गाडे गुलटेकडी भाजी मार्केट यार्डममध्ये भाजीपाल्याचा व्यवसाय करतो. भाजीपाला विकून येत असताना स्वारगेट बस डेपोमध्ये हा प्रकार घडला. आमचा पोलीस यंत्रणेवर व न्यायालयावरही विश्वास आहे. ज्या पीडित महिलेबरोबर ही घटना घडली, त्यांनाही न्याय मिळायला हवा. न्यायालय जो निकाल देईल, तो आम्हाला मान्य असेल. न्यायालयाने दत्ता गाडेला फाशीची शिक्षा दिली, तरी आम्हाला मान्य आहे. त्याचे आम्हाला अजिबात वाईट वाटणार नाही. मात्र या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी, असं त्यांनी सांगितले.

मागील तीन दिवस माध्यमांनी फक्त नाण्याची एकच बाजू दाखवली. चौकशीनंतर नाण्याची दुसरी बाजूही दाखवावी,असे आवाहन आरोपी दत्ता गाडेच्या भावाने केले आहे. ''गावातल्या लोकांचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. आमच्याशी संपर्क ठेवण्याची त्यांची अजिबात इच्छा नाही'',असेही आरोपीच्या भावाने सांगितले.यावेळी दत्ता गाडेवर दाखल असलेल्या सात गुन्ह्यांबाबत बोलताना त्याने सांगितले की, त्याच्यावरील गुन्ह्यांची आम्हाला कल्पना आहे. सातपैकी एका गुन्ह्यात त्याची निर्दोष मुक्तता झाली आहे.

'भाऊ गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्यामुळे आपण त्याच्याशी फार बोलत नव्हतो,असेही गाडेच्या भावाने सांगितले.तसेच तो गावातून भाजीपाला उचलून शहरात आणून विकण्याचे काम करत होता. तो माझा भाऊ असला तरी तो जर गुन्हेगार असेल तर त्याला शिक्षा झालीच पाहीजे,अशीही स्पष्ट भूमिका गाडेच्या भावाने मांडली.

**वाचकांच्या लेखणीतून**

# शिलेदार आणि बारगीर



शिलेदार घरधनी माझा
थोर मनाला ज्यांचा राजा
भोळा भोळा जीव माझा
जडला त्याच्या पायाला...

मोहित्यांची मंजुळा या चित्रपटात बाई बाई मन मोराचा कसा पिसारा फुलला या मुखड्याचे एक सुंदर गीत आहे. त्या गीतात वरील अंतरा आलेला आहे.

मला इतिहास विषयाची आवड आहे. मध्ययुगीन इतिहास वाचताना शिलेदार आणि बारगीर असे सैनिक शिपायांचे दोन ठळक प्रकार वाचनात येत असत. शिलेदार आणि बारगीर या शब्दांचे अर्थ मला ठाऊक नव्हते. ते नंतर जाणून घ्यावे लागले.

शिलेदाराजवळ स्वतःचा घोडा आणि (ढाल, तलवार इ.) शस्त्रे असत. बारगीराजवळ राजाने दिलेला घोडा आणि शस्त्रे असत. राजा आज्ञा करील तेव्हा शिलेदारांना आपले घोडे आणि शस्त्रे घेऊन शत्रूशी लढण्यासाठी त्याच्या सैन्यात हजर व्हावे लागे. त्यांना त्यासाठी तनखा मिळत असे. बारगिरापेक्षा शिलेदार हे पद प्रशस्त मानले जाई. म्हणूनच बाई बाई मन मोराचा...या गीतात शिलेदार शब्द फार सटीक आणि काव्यमय वाटतो.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# जिल्हावासियांचे प्रेम कधीही विसरू शकणार नाही !

## जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांचे उद्गार

**नगर : प्रतिनिधी**

**समाजाच्या सर्वच स्तरातील घटकाच्या कल्याणाची, त्यांना न्याय मिळवून देण्याची संधी प्रशासकीय सेवेतून मिळत असते. याच मिळालेल्या संधीतून गत दोन वर्षात विकासकामांतून जिल्ह्याच्या वाढलेल्या लौकिकात सर्व विभागांचे सहकार्य मोलाचे ठरले. प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी केलेले सहकार्य तसेच जिल्हावासीयांनी दिलेले प्रेम कधीही विसरू शकणार नसल्याचे भावनिक उद्गार जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी काढले.**



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, प्रभारी जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील आदी उपस्थित होते.

सालीमठ म्हणाले, जनकल्याणाची भावना मनी बाळगत दुसऱ्याचं दु:ख, त्यांच्या अडचणी आपल्या समजून घेत शासनाच्या विविध योजनांच्या लाभातून सामान्यांचे जीवन सुकर करण्याचे काम व्हावे. आपल्या कामांमध्ये कुठल्याही प्रकारचा वैयक्तिक अभिनिवेश न बाळगता संघभावनेतून प्रत्येकाने काम करण्याची गरज आहे. तत्पूर्वी मावळते जिल्हाधिकारी सालीमठ यांचा मानपत्र देऊन प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# पारनेर महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

## भारतीय ज्ञान परंपरेतील सर्व घटकांवर होणार चर्चा

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये भारतीय ज्ञान परंपरा-स्वरूप आणि व्याप्ती या विषयावर बुधवार दि. ५ रोजी राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.**

भारतीय ज्ञान परंपरा अत्यंत समृध्द आहे. ज्ञान आणि विज्ञान लौकिक आणि परावलौकिक कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग याचा अदभूत समन्वय भारतीय ज्ञान परंपरेत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेवर भर देण्यात आलेला आहे. अशा परंपरेचे स्वरूप आणि व्याप्ती समजून घेणे आज काळाची गरज आहे. त्यामुळेच महाविद्यालयात या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील सर्व घटकांवर या चर्चासत्रामध्ये चर्चा होणार आहे.



### मान्यवरांचे मार्गदर्शन

**देशभरातील १७५ प्राध्यापक, ११३ शोधनिबंध या चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी देशभरातून विविध महाविद्यालये व विद्यापीठांमधून १७५ प्राध्यापक व शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी नोंदणी केली आहे. या विषयास अनुसरून ११३ शोधनिबंध प्राप्त झाले आहेत.**

या चर्चासत्रामध्ये राष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध सादर करण्यात येणार आहेत. या चर्चा सत्रात जास्तीत जास्त प्राध्यापकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, चर्चासत्राचे संयोजक डॉ. विजयकुमार राऊत, समन्वयक डॉ. दीपक सोनटक्के यांनी केले आहे.

### मान्यवरांचे मार्गदर्शन

**या चर्चासत्रामध्ये नवी दिल्ली येथील केंद्रीय हिंदी निदेशालय उच्च शिक्षण मंत्रालयाचे प्रा. सुनील कुलकर्णी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळ समितीचे संचालक प्रा. प्रभाकर देसाई, नगरच्या न्यू आर्टस कामर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे निवृत्त प्राध्यापक प्रा. विजय काळे, राजस्थान येथील केंद्रीय विद्यालयाचे प्रा. सन्मती पांडे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्राचे अध्यक्षस्थान जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सहसचिव जयंत वाघ हे भुषविणार आहेत.**

# शेतरस्त्यांच्या हद्दी सरसकट निश्चित करणार

## जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांची ग्वाही

**सुपा : प्रतिनिधी**

**राज्यातील गाव नकाशावरील शिव-पाणंद शेतरस्त्यांच्या हद्दी सरसकट निश्चित करण्यात येतील अशी ग्वाही जमाबंद आयुक्त तथा राज्याचे भुमि अभिलेख संचालक डॉ. सुदास दिवसे यांनी दिली.**




ब्रिटीशकालिन शिव-पाणंद शेतरस्त्यांना तातडीने खुले करून हद्द निश्चिती करावी या मागणीसाठी शिव-पाणंद शेत रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांनी जमाबंदी आयुक्तांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यावेळी डॉ. दिवसे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हद्द निश्चितीबाबत ग्वाही दिली.

शेत रस्त्यांना नंबरी लाऊन त्यांचे विशिष्ट कालावधीत सर्वेक्षण सुरू करून नंबरी हटविणारांवर दंडात्मक कारवाई करावी, पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजनेसह इतर शासन निर्णयाप्रमाणे निःशुल्क मोजणी असताना तालुका अभिलेख कार्यालयाकडून आकारण्यात आलेले शुल्क शेतकऱ्यांना व्याजासह परत मिळावे, अतिक्रमित शासकीय शेत रस्त्यांसंबंधी कोणीही तक्रार केल्यास तातडीने कार्यवाही करण्यात यावी, शासकीय अधिकाऱ्यांनी शेत रस्ता केसेस चालवाव्यात,शेत रस्त्यांच्या हद्द निश्चित झाल्यानंतर अपिलाचा अधिकार नसावा, राज्यातील सर्व शेत रस्त्यांच्या मोजण्या विहीत कालावधीत अति तातडीने गाव नकाशावरील सर्वर्स बंद शेतरस्त्यांचा अहवाल मागवून तातडीने बंद रस्ते सुरू करण्यासाठी आदेश देण्यात यावेत, शेतरस्त्यांची लांबी, रूंदी नकाशावर नमुद करावी अशा मागण्या यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

### शेत रस्त्यांचा प्रश्न गंभीर

**शेतरस्त्यांच्या प्रश्नामुळे राज्यात अनेक शेत जमीन पडीक पडत असून अनेक शेतकरी फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये अडकून पडत आहेत. पिढयान पिढया प्रशासकीय, न्यायालयीन संघर्ष सुरू आहे. शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजवणी होत नाही.शेतीसाठी आधुनिक यंत्रसामग्रीच्या दळणवळणासाठी शेतरस्त्यांची आवष्यकता निर्माण झाली आहे. तुकडेवारी भाऊ हिस्सेदारी, वाटप पत्रानंतर शेत रस्त्यांचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.**

# बाबासाहेब कवाद यांच्या प्रेरणेतून सेवाभाव

## ठकाराम लंके यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**स्व.बाबासाहेब कवाद यांनी पन्नास वर्षात सामाजिक, धार्मिक योगदान दिले असून त्यांचीच प्रेरणा घेत दामूशेठ लंके यांच्यासारख्या शेकडो कार्यकर्त्यांकडून समाजात सेवाभावी काम करण्यात येत असल्याचे माजी सरपंच ठकाराम लंके यांनी सांगितले.**

बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक दामूशेठ लंके यांचे वडील देवराम लंके व मातोश्री लक्ष्मीबाई लंके , मोठे बंधू नाथाशेठ लंके यांच्या स्मृती प्रित्यर्थ दामूशेठ लींके यांच्या वतीने मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचलित प्रसादालयात दिवसभर अन्नदान केले.६०० हून अधिक भाविकांनी या अन्नदानाचा लाभ घेतला. तसेच प्रसादालयास २ हजार १०० रूपयांची देणगीही दिली.

लंके यांचा निघोज सेवा संस्थेचे चेअरमन सुनील वराळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, व्यापारी असोसिएशनचे रामदास वरखडे, सामाजिक कार्यकर्ते अनिल नऱ्हे, व्यवस्थापन महेश ढवळे, प्रसादालयाचे आचारी दत्तात्रय चौधरी आदी उपस्थित होते.

उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यावेळी बोलताना म्हणाले, दामूशेठ लंके यांनी मुंबई येथे व्यवसाय करताना निघोज व परिसरातील सामाजिक व धार्मिक कार्यात सातत्याने सहभागी होत योगदान दिले आहे. विकासाभिमुख कामांना पाठबळ देणारे एक ज्येष्ठ नेतृत्व म्हणून त्यांचा नावलौकिक असल्याचे कवाद यांनी सांगितले. ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे यांनी सुत्रसंचलन केले तर सागर ईरोळे यांनी आभार मानले.

# मीटर नाही, वीजही नाही, तरीही हजारांचे बिल!

## महावितरणचा भोंगळ कारभार | ग्राहक हैराण

**पारनेर : प्रतिनिधी**

**वीज पुरवठाच होत नसताना महावितरणकडून दरमहा हजारांचे बिल पाठविण्याचा अजब प्रकार पारनेरमध्ये पुढे आला आहे. पारनेर शहरातील कुंभार गल्लीतील एक घर दोन वर्षांपासून बंद असल्याने महाविरणच्या कर्मचाऱ्याने त्याच वेळी विज पुरवठा खंडीत करून मीटरही काढून नेले आहे. असे असतानाही संबंधित कुटूंबाला दरमहा हजारो रूपयांचे बिल महावितरणकडून पाठविण्यात येत असल्याने ते कुटूंब मात्र हैराण झाले आहे.**



संबंधित कुटूंब त्या घरात राहत नाही. कुलूपबंद घरातील मिटरही काढून नेण्यात आलेले असताना विज पुरवठयाचा व त्याच्या वापराचाही प्रश्न उद्भवत नाही. तरीही दरमहा हजारोंचे बिल आकारले जात असल्याने ग्राहकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. हे बिल कशासाठी आकारण्यात येत आहे याचे उत्तर मात्र महावितरणकडे नाही.

### उपअभियंत्यांचे अजब उत्तर !

**यासंदर्भात पारनेर येथील महावितरण कार्यालयातील उपअभियंता हातोळकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला असता आमच्या प्रणालीत असेच बिल येते. खातेदारांनी प्रत्यक्ष येऊन विचारणा केल्यास आम्ही बिल कमी करू असे अजब उत्तर त्यांच्याकडून मिळाले. ग्राहक प्रत्यक्ष कार्यालयात आल्याशिवाय चुकीचे बिल दुरूस्त होणार नाही या महावितरणच्या भूमिकेमुळे ग्राहकांमध्ये संतापाची भावना आहे.**

### अन्यथा आंदोलन

**महावितरणकडून होणारी ग्राहकांची फसवणूक थांबवून चुकीच्या बिलांची तातडीने दुरूस्ती करावी. या प्रकराची सखोल चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे. निघोज व परिसरातही यापूर्वी ग्राहकांना असेच प्रचंड बिल देउन ते न भरल्यास विज पुरवठा खंडीत करण्याचे कारनामे महावितरणकडून करण्यात आले होते. ग्राहकांच्या या समस्यांचे निराकारण न झाल्यास ग्राहकांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**

# कवाद इंग्लिश स्कुलमध्ये विज्ञान प्रदर्शन

## चित्रकला, रांगोळी, हस्तकला आणि लँग्वेज कॉर्नरही




**घोडोबा फाटा : प्रतिनिधी**

**विज्ञानाचे महत्व लक्षात घेऊन श्री.बाबासाहेब कवाद न्यू इंग्लिश मिडियम स्कुलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनाबरोबरच चित्रकला, रांगोळी, हस्तकला व लँग्वेज कॉर्नरचेही यावेळी आयोजन करण्यात आले.**

विविध प्रदर्शनांमधूनच विद्यार्थ्यांना वेगवेगळया क्षेत्रात करिअरच्या संधी मिळू शकतात असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी केले.

प्रदर्शनानिमित्त विद्यार्थ्यांनी सुंदर रांगोळया रेखाटतानाच हस्तकलेतूनही विविध उपकरणे तयार केली होती. चित्रकलेच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांनी लक्ष वेधून घेतले. विज्ञान प्रदर्शनात सादर करण्यात आलेले प्रोजेक्ट लक्षवेधी होते.

यावेळी बाबासाहेब कवाद गामविकास सेवाभावी संस्थेचे सचिव वसंत कवाद, मा. सरपंच चंद्रकांत लामखडे, व्यापारी असोसिएशनचे रामदास वरखडे, कवाद पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, संचालक भिवाशेठ रसाठ, डॉ. प्रवीण जाधव, खंडूशेठ लामखडे, सुनील तांबे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी प्रदर्शन पाहिल्यानंतर उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या कला गुणांची प्रशंसा करून हे शिक्षण संकुल आदर्श व भावी पिढी घडविण्याचे काम करत असल्याचे गौरवोदगार काढले.मुलिकादेवी महाविद्यालयाचे अशोक कवडे व अपेक्षा लामखडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व विश्वस्त व परिसरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेले पदाधिकारी, प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्याथ व पालक यांनी प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी केली होती.

# पिराच्या मळयात रस्ता आणि पाण्याची समस्या

## रहिवाशांनी वेधले तहसिलदार, बीडीओंचे लक्ष




**भाळवणी : प्रतिनिधी**

**भाळवणीतील पिराच्या मळयातील रहिवाशांना रस्ता तसेच पिण्याच्या पाण्याच्या समस्येने ग्रासले असून तहसिलदार व गटविकास अधिकाऱ्यांनी या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरीकांची गैरसोय दुर करण्याची मागणी या मळ्यातील नागरीकांनी निवेदनादवारे केली आहे.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नागेश्वर मंगल कार्यालय ते कांगुणे वस्ती हा रस्ता अनेक शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याने अरूंद झालेला आहे. त्यातच या रस्त्याची दुरावस्था झाल्याने नागरिकांच्या हाल आपेष्टांना पारावार राहिला नाही.

दोन्ही प्रश्न पिराच्या मळ्यातील नागरीकांच्या दृष्टीने जिव्हाळयाचे असून ते तातडीने दूर करणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. निवेदनावर संदीप प्रभाकर रोहोकले, अजिंक्य संतोष मोरे, प्रथमेश अनंत रोहोकले, राहुल कृष्णा सुरूसे, संदीप दगडू कपाळे, जितेंद्र शिवाजी रोहोकले आदी.ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

### अतिक्रमणामुळे समस्या

**या रस्त्याच्या अतिक्रमणाच्या वादामुळे भाळवणी ग्रामपंचायत मार्फत पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून या परिसरातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बंद आहे. या रस्त्याची दुरावस्था झाल्याने रस्त्याच्या कामासाठी निधीही मंजुर आहे, मात्र अतिक्रमणे असल्याने रस्त्याचे कामही होऊ शकत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.**

# पाडळी रांजणगांवला हायमॅक्ससाठी १० लाख निधी

## निधीसाठी पालकमंत्री विखे यांची शिफारस

**पाडळी रांजणगांव : प्रतिनिधी**

**पाडळी रांजणगांव येथील सातपुते वस्तीमध्ये हायमॅक्स दिवे बसविण्याच्या कामासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या विशेष शिफारसीमुळे १० लाख रूपयांचा निधी मंजुर झाल्याचे सरपंच विक्रमसिंह कळमकर यांनी या कामाच्या शुभारंभाप्रसंगी सांगितले.**



जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत दलित वस्ती सुधार योजनेतून या कामासाठी निधी प्राप्त झाला आहे. दोन वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीने केलेल्या मागणीनंतर ही वस्ती दलित वस्ती म्हणून घोषीत करण्यात आलेली आहे. हे वास्तव असताना गावातील विरोधक मात्र ज्यांचे जिल्हा परिषद सदस्यत्व जाऊन तीन वर्षे झाली त्यांनी निधी दिल्याचे सांगून ग्रामस्थांची दिशाभुल करत असल्याचा टोला कळमकर यांनी लावला. विकास कामे करण्यासाठी सत्ता महत्वाची असते. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून गावामध्ये यापुढील काळात मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावण्याची संधी आहे. ग्रामस्थांनी विरोधकांच्या खोट्या अपप्रचाराला बळी न पडता गावाच्या विकासासाठी ग्रामविकास मंडळाच नेहमी साथ द्यावी असे आवाहन कळमकर यांनी यावेळी केले.


यावेळी सोसायटीचे चेअरमन डी.बी.करंजुले, अप्पासाहेब साठे, उपसरपंच संगम साठे, मा. सरपंच मोहिनी सातपुते, अशोक जाधव, अर्चना करंजुले, किसान साठे, विशाल करंजुले, जिजाबाई उबाळे,शितल फडके, मीना उबाळे, सुरेखा सातपुते, बाळू सातपुते, गणेश सातपुते, अशोक सातपुते, गोवर्धन खेसे, भास्कर पाटील, अशोक उबाळे, सुधीर करंजुले आदी उपस्थित होते.

# भांडगावला खासदार चषक क्रिकेट स्पर्धा

## | खा.नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य | हजारो रूपयांची बक्षिसे

**भांडगाव : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भांडगाव येथील राजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या भांडगाव यांच्या वतीने दिनांक ७ ते ११ मार्च रोजी भव्य खासदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.**



या स्पर्धेसाठी माजी पंचायत समिती सदस्य विकास रोहोकले यांच्या वतीने प्रथम क्रमांकासाठी ७१ हजार रुपयांचे बक्षीस तर दुसऱ्या क्रमांकासाठी निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने ५१ हजार तिसऱ्या क्रमांकासाठी राजा शिव छत्रपती प्रतिष्ठान भांडगाव यांच्या वतीने ३१ हजार तर व सान्वी इन्व्हेस्टमेंट आणि प्रसाद शिंदे यांच्या वतीने २१ हजाराचे चौथ्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात येणार आहे.

भांडगाव येथील वीर सावरकर मैदानावर ही स्पर्धा रंगणार असून स्पर्धेचे प्रेक्षपण यू ट्यूबवर लाईव्ह दाखविले जाणार आहे.

### खा.लंके यांच्या शुभेच्छा

**माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधून भांडगाव येथील राजा शिव छत्रपती प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या खासदार चषक स्पर्धेला शुभेच्छा.आयोजकांना धन्यवाद. ही स्पर्धा खिलाडूवृत्तीने व पारदर्शीपणे व्हावी.**

**खा. नीलेश लंके**
संसद सदस्य

### ३२ वर्षांची परंपरा

**भांडगाव येथील क्रिकेट स्पर्धेला ३२ वर्षांची जुनी परंपरा आहे यावर्षी खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खासदार चषक स्पर्धेचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे.यावेळी हजारो रुपयांच्या बक्षीस वितरित करण्यात येणार आहे.या स्पर्धेचा सर्व क्रिकेट प्रेमींनी लाभ घ्यावा.**

**प्रसाद शिंदे,** मा.उपसरपंच , भांडगाव

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com